Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844762

# डिजिटल सोसायटी आणि बदलते सामाजिक संबंध

प्रा. गणेश तुकाराम मोकासरे[1]

**प्रस्तावना:**

परिवर्तन हे समाजाचे प्रमुख वैशिष्ट आहे. स्थळ, काळ, वेळ यानुसार समाज कमी अधिक प्रमाणत परिवर्तीत होत जातात. असा कोणताही समाज नाही ज्यामध्ये आजपर्यंत परीवर्तनच झालेले नाही. परिवर्तन म्हणजेच सामाजिक संरचनेत झालेला बदल होय. जस-जसा काळ बदलत जातो, तस तसा समाजही बदलत जातो. प्राचीन काळात गुहेत राहणारा माणुस ते आजच्या आधुनिक डिजिटल समाजात राहणारा माणुस हा प्रवास एक सामाजिक परीवर्तनाच इतिहास आहे. औद्योगीकरण, जागतिकीकरण, आधुनकीकरण या प्रकीयेंमुळे जगामध्ये मोठया प्रमाणात सामाजिक परीवर्तन झालेले आपण बघीतलेले आहे.

आजच्या समाजात माहिती तंत्रज्ञानाला खुप महत्वाचे स्थान आहे. आजच्या समाजातील जास्तीत जास्त सामाजिक संबध हे डीजीटल झालेले आहेत. त्यामुळे त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक आंतरक्रीया हयाही डिजिटल झाल्या. आज कुटूंब, विवाह, धर्म, अर्थ, राज्य, नातेदरी या मुलभूत संस्थावरही डीजीटलतेचा खुप मोठा प्रभाव पडलेला दिसतो. या संस्थात ही मोठयाप्रमाणात सोसीयल मेडीया, इंटरनेट, मोबाईल इ. खुप प्रभाव पडलेला आहे. समाजाच्या सामाजिक संबध व कार्यात बदल होउन सामाकि संरचनेत बदल होत आहे, यालाच आपण सामाजिक परीवर्तन असे म्हणतो. सदरील पेपर मध्ये डिजिटल सोसायटीमुळे समाजात काय बदल झाले याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**की- वर्ड**: डिजिटल सोसायटी, सामाजिक संबध, सामाजिक परिवर्तन

**उद्येश:**

1. डिजिटल समाजातील बदलत्या सामाजिक संबंधाचा आढावा घेणे.
2. डिजिटल सोसायटीचे परिणाम जाणूण घेणे.

[1] सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**गृहितकृत्य:**

१. डिजिटल सोसायटीमुळे जलद व जागतिक संबंधात वाढ झाली.
२. डिजिटल सोसायटीचे समाजावर नकारात्मक परिणाम झालेले आहेत.

**अध्ययनपध्दती:**

सदरील पेपर तयार करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला . ज्यात संदर्भ ग्रंथ, मासिके , इंटरनेट वरील अहवालांचा या स्त्रोतांचा वापर करण्यात आला. वर्णणात्मक संशोधन पध्दतीच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**संकल्पना विश्लेषन:**

**डिजीटल सोसायटी:**

डिजिटल सोसायटी किंवा डिजिटल समाज म्हणजे ज्या समाजातील सामाजिक आंतरक्रीया व सामाजिक संबध हे मोठया प्रमाणात माहिती तंत्रज्ञानावर आधारीत असतात, लोक मोठया प्रमाणात सामाजिक मीडीया, इंटरनेट, मोबाईल, संगणक व तंत्रज्ञानावर आधारीत सामाजिक आंतरक्रीया करतात. तसेच जिथे माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन जीवनातील प्रत्येक क्षेत्रात केला जातो. जसे की, इंटरनेट, स्मार्टफोन आणि संगणक याद्वारे सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक व्यवहार केले जातात.

**सामाजिक संबध:**

सामाजिक संबधाचे जाळे म्हणजेच समाज होय. गिन्सबर्ग यांच्यामते, “दोन किंवा अधिक व्यक्तीमध्ये सामाजिक परस्पर क्रीयेच्या प्रकीयेतून निर्माण होणारा सातत्यपुर्ण संबध म्हणजे सामाजिक संबध होय. ‘सामाजिक संबध हे व्यक्ती –व्यक्ती, व्यक्ती-समूह व समूह- समूहा मध्ये प्रस्थापीत होत असतात. या सामाजिक संबधामुळेच सामाजिक आंतरक्रीया निर्माण होतात.’

**सामाजिक परिवर्तन:**

समाजाच्या संरचनेतील बदलाला सामाजिक परीवर्तन असे म्हणतात. समाजात झालेला छोटासा तात्पुरता बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे, तर सामाजिक संबध, सामाजिक संस्था व संरचना यामध्ये बदल होउन समाज परिवर्तन होत असते. हॅरी जॉन्सनच्या मते, मुलभूत अर्थाने सामाजिक संरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय. तर किंग्जले डेव्हीड हे सामाजिक संरचनेत व कार्यात झालेल्या बदलाला सामाजिक परीवर्तन असे म्हणतात.

**सैध्दांतिक चौकट:**

सदरील पेपर तयार करतांना सामाजिक परीवर्तनाचा सिध्दांत हा संदर्भ चौकट म्हणून वापरण्यात आलेला आहे. या सिध्दांताप्रमाणे जेव्हा सामाजिक संरचनेत व सामाजिक संबधात बदल होतात, तेव्हा सामाजिक परिवर्तन घडून येते. याप्रमाणेच आजच्या डिजिटल सोसायटीमुळे सामाजिक संबधात कोणते बदल झालेले आहेत. याबदलामुळे सामाजिक परिवर्तन कसे घडून आले याचा आढावा या पेपर मध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे

**डिजिटल सोसायटीचे वैशिष्टये:**

- **डिजिटल सामाजिक संबध:** इंटरनेटच्या माध्यमातून व्यक्ती, समूह, संस्था व सरकार एकमेकांशी कायमस्वरूपी जोडलेले असतात.
- **अप्रत्यक्ष आंतरक्रीया :** व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती -समूह आणि समूह-समूह यातील आंतरक्रीया हया प्रत्यक्ष ऐवजी अप्रत्यक्षच जास्त होतात. जसे मोबाईल मेसेज, मेल, सोशीयल मेडीया इ.
- **डिजिटल साक्षरता:** समाजातील लोकांना माहिती-तंत्रज्ञान वापरण्याचे मूलभूत ज्ञान असते.
- **डिजिटल अर्थव्यवस्था:** आर्थिक व्यवहार, खरेदी-विक्री आणि बँकिंग सेवा डिजिटल स्वरूपात उदा. इंअरनेअ बँकींग, फोन पे, डीजीटल रुपया, डीजीटल गोल्ड, डीजीटल बॉन्ड इ. होणे.
- **ई-प्रशासन:** सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध असणे, ज्यामुळे पारदर्शकता आणि वेग वाढतो उदा. आपले सरकार पोर्टल.

थोडक्यात, जेव्हा तंत्रज्ञान हे केवळ मनोरंजनाचे व उपजीविकेचे साधन न राहता जगण्याची पद्धत बनते, तेव्हा त्याला 'डिजिटल सोसायटी' असे म्हणतात.

**डिजिटल सोसायटी आणि बदलते सामाजिक संबंध:**

भारतात जून 2025 पर्यंत 95 कोटी लोक इंटरनेटचा वापर करत होते. ज्यात 60 टक्के पेक्षा अधिक लोक हे सोशीयल मेडीयावर सक्रीय होते. (दै. अमर उजाला,७ ऑक्ट,२०२५.) याचाच परिणाम सामाजिक संबंधावर झाला. कुटुंब व विवाह हया दोन महत्वाच्या मुलभूत सामाजिक संस्था आहेत. यासंस्था व्यक्तीच्या समाजीकरणात व व्यक्तीमत्व विकासात महत्वाच्या भूमिका निभवतात. यातील सामाजिक संबध हे अत्यंत जिव्हाळयाचे असतात. परंतु आजच्या डिजीटल समाजामुळे कुटूंबातील संवाद वेगवान झाला. कोणत्याहि ठिकाणाहून आपल्या कुटूंबातीत सदस्यांशी कॉलव्दारे किंवा मेसेजव्दारे संवाद साधणे सहज शक्य झाले. भारतातील आजी- आजोबा आता अमेरिकेतील आपल्या नातवाला सहज

व्हीडीओ कॉलव्दारे साता समुद्रापार दररोज संपर्क साधत आहे. डिजीटलीकरणामुळे काल, वेळ व अंतर यांच्या मर्यादा संपून सहज सामाजिक संपर्क स्थापण होत आहे. परंतु यामुळे अप्रत्यक्ष संबधातही मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसते. तसेच कुटूंबातील सदस्यपुर्वी सारखे एकत्र बसून चर्चा न करता आपआपल्या खोलीत जाउन सोसीयल मेडीया किंवा इंटरनेवर काही कामे करतांना दिसतात. त्यामुळे सामाजिक संबध दुरावा आलेला दिसतो. ऑनलाईन शिक्षण व डिजीटल मनोरंजनामुळे मुलांचा स्क्रीन टाईम खूप वाढलेला दिसतो. वर्क फॉम होममुळे व ऑनलाईन कामामुळे महिलांचाही आर्थिक कामात सहभाग वाढलेला दिसतो.

विवाह संस्थेतही डिजिटल संबधामुळे खुप बदल झालेले दिसतो, ज्यात प्रामुख्याने साथीदार निवडीच्या प्रथा परंपरा कमी होउन मॅट्रीमोनियल साईट, सोशीयल मेडीया, डेटींग ॲपचा वापर वाढला आहे. भारतात जवळपास १५०० मॅट्रीमोनियल साईट आहे व २२ दशलक्ष लोक डेटिंग ऍपचा वापरतात. त्यामुळे अरेंज मॅरेज ऐवजी प्रेंम विवाह, आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीयविवाह यांचे प्रमाण वाढत आहे. प्री-वेडीग सारख्या नवीन प्रथातही भर पडत आहे. डीजीटल माध्यमांमुळे गैरसमज व संशय यामध्ये वाढ होउन घटस्फोटाचे प्रमाणही वाढलेले दिसते.

डिजिटल सोसायटीत शिक्षण संस्थेतील सामाजिक संबंधात अमुलग्र बदल झालेले दिसतात. ऑनलाईन शिक्षणामुळे गुरू-शिष्य संबंध संपुष्टात येण्याची भिती निर्माण झालेली आहे. विद्यार्थ्यांचा यु-टुब, ऑनलाईन इज्यूकेशनल ऍप याव्दारे घरीबसून शिक्षण घण्याकडे कल वाढला आहे. भारतात जवळपास २५० दशलक्ष विद्यार्थी वेगवगळया प्लॅटफॉमच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण घेत आहे. ई –बुक्स व ई लॅबमुळे विद्यार्थ्यांना ग्रंथालयात जाण्याची फारशी गरज राहीलेली नाही. त्यामुळे विद्यार्थी व ग्रंथालयातील कर्मचारी याचे संबधही कमी होत आहे.

डिजिटल सोसायटीत अर्थसंस्थेतही बरेच बदल दिसतात. आज डीजीटल अर्थव्यवस्थेचाच सगळीकडे बोल बाला दिसतोय. भारत हा डिजिटल पेमेंट मध्ये जगात पहिल्या कंम्राकावर आहे. भारतातील 85 टक्के लोक डिजिटल पेमेंट युपीआय व्दारे करतात.( दै.दिव्य मराठी,२० जुलै २०२५.) डिजिटल पेमेंटमुळे बँकीग संबधांत अमुलाग्र बदल झालेले दिसतो. आठवडयातुन एकदा बँकेत जाणारा व्यक्ती वर्षानुवर्षे बँकेत जात नाही. घरात व खिशातही फारसे पैसे ठेवण्याची गरज उरलेली नाही. सर्व पेमेंट ऑनलाईन झाल्याने याची गरजच भासत नाही. याशीवाय बीटकॉईन सारख्या डीजीटल करंन्सी सुध्दा तयार झालेल्या आहेत. शेअर मार्केट व डीजीटल करंन्शी, गोल्ड इ. क्षेत्रात लोकांची गुंतवणूक वाढलेली दिसते. Flipkart, Amazon यासारख्या नवीन बाजारपेठा निर्माण झाल्यामुळे ग्राहक व मालक संबधातही बदल झालेले आहेत.

डिजिटल सोसायटीच्या प्रभावापासून धर्मही दूर राहू शकला नाही. डिजिटल समाजामध्ये धर्मगुरू, साधु-संत व सामान्य भक्त यांच्यातील सामाजिक संबधात बदल झालेला दिसून येतो. आज धार्मिक आचार, विधी, यांचे मोठयाप्रमाणावर डिजीटलीकरण झालेले आहे. यामध्ये लाईव्ह दर्शन सुविधा, ऑनलाईन पूजा, आरती, ई प्रसाद, ई-दान यासारख्या सुविधा

सुरू झालेल्या दिसून येतात. वेगवेगळे धर्मगुरू सोशीयल मेडीया, युटयूब, वेबसाईट इ. माध्यमातून आपला धर्म प्रसार करत आहे. याशिवाय आजच्या डिजीटल सोसायटीमुळे धर्मातील कर्मकांडावर काही अक्षेपही घेतल्या जात आहे. त्यामुळे कर्मकांड कमी होतांनाही दिसून येत आहे.

**डिजिटल सोसायटीचे सकारात्मक परिणाम:**

- जलद संपर्क व संबधाची निर्मीती
- जागतिक संपर्क होउन आंतरराष्ट्रीय संबध निर्माण झाले
- वेळ व पैशाची बचत
- डिजिटल अर्थव्यवस्थामुळे आर्थिक संबधात सुलभता
- ई- गव्हर्नन्समुळे शासकीय व प्रशाकीय संबध पारदर्शक व जलद झाले
- सोशीअल नेटवर्कींग मुळे एकाचवेळा बहुसंख्य लोकाशी संर्पकात राहणे शक्य झाले.
- डिजिटल साक्षरतेमुळे तांत्रिक ज्ञानात वाढ
- डिजिटल शिक्षणामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण

**डिजिटल सोसायटीचे नकारात्मक परिणाम:**

- दिखाउ सामाजिक संबध
- सामाजिक दुरावा व मानसिक अस्वास्थ
- सायबर गुन्हेगारी
- एकाकीपणा
- अफवा व खोटी माहीती
- - डिजीटल दरी
- फबिंग (समोरच्याकडे लक्ष न देता आपण मोबाईल बघत राहणे.)

**सारांश:**

जेव्हा समाजातील बहुतांश क्षेत्रात तंत्रज्ञानावर आधारीत आंतरक्रीया व सामाजिक संबध प्रस्थापीत होतात तेव्हा त्या समाजाला डिजिटल समाज म्हणले जाते. थोडक्यात, जेव्हा तंत्रज्ञान हे जगण्याची पद्धत बनते, तेव्हा त्याला 'डिजिटल सोसायटी' असे म्हणतात. आज भारतीय समाज हा डिजिटल समाज बनत चालला आहे. कारण भारतातही मोठया प्रमाणात सोशीअल मेडीया वापरला जात आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर सूरू झाला आहे. कुटूंबातील सदस्याचे संबध हे मेसेज, मेल, व्हीडीओ कॉल वर होत आहे. विवाह संस्थेतील संबध हे मॅर्टिमोनियल साईट, सोशीयल मेडीया, डेटींग

ऍपवर आधारीत झालेले आहेत. अर्थ संस्थेतील सामाजिक संबध हे ई- कॉमर्स, डिजिटल इकॉनॉमी, ई- बॅंक, डिजिटल पेमेंट वर आधारीत झालेले आहे. धर्मीक संबध व शिक्षण ही डीजीटल झालेले आहे त्यामुळे गुर- शिष्य व धर्मगुरू व भक्त हे संबध ही डिजिटल झालेले आहेत. यासर्वाचे काही सकारात्मक तर काही नकारात्मक परीणामही आहेत. परंतु यातील नकारात्मक परीणाम दूर करून, सावध व सजग राहून पुढे जाणे गरजेचे आहे. कारण डिजिटल समाज ही आता काळाची गरज झालेली आहे. आजच्या आधूनिक काळात त्याशीवाय दूसरा पर्याय नाही.

**संदर्भ:**

1. आहूजा,राम. (2010). सामाजिक अनुसंधान,रावत पब्लीकेशन. जयपूर.
2. डॉ. साळुखे, सर्जेराव. (2022). प्रोफीशन्ट पब्लिशिंग हाउस. पुणे.
3. Linda, C., Ashar, J. D. (2024).Social Media Impact: How Social Media Sites Affect Society.https://www.apu.apus.edu/area-of-study/business-and-management/resources/how-social-media-sites-affect-society/
4. Crouch, Giles. (2023, March). Societal Change in the Digital Age. https://gilescrouch.medium.com/societal-change-in-the-digital-age-c3df574fd97c
5. Itihaasa. (2024, Feb). Digital Society in India-A Study of Urban City, Bengaluru. https://itihaasa.com/public/pdf/Digital_Society_in_India.pdf

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*